**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः04.08.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन,

२. महाराष्ट्रासह, सहा राज्यांमधील पश्चिम घाट परिसर, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवी अधिसूचना जारी,

३. पुण्यात निळ्या पूररेषेतील नागरिकांचं कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश,

४. अन्य राज्यातील विद्यार्थ्यांनाही आता आयुर्वेदाच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी राज्यात प्रवेश मिळणार, आणि

५. राज्यातील सर्व आय टी आय आणि तांत्रिक विद्यालयात संविधान मंदिर उभारण्याचा राज्य शासनाचा निर्णय.

**मोदी अर्थ परिषद**

भारतात मुबलक अन्नधान्य उपलब्ध असून, जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या, 32 व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. यावर्षीच्या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेनं परिवर्तन’ अशी आहे. सरकार कृषी क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी विविध सुधारणा आणि उपाययोजना करत असून, शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा व्यापक हेतू त्यामागे आहे. कृषिक्षेत्र भारत सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी आहे, असं ते म्हणाले. भारत भरडधान्य, तृणधान्यं आणि मसाल्यांचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. देशातील अन्नधान्य विविधता

जगासाठी आशेचा किरण असून जगापुढील अन्नसुरक्षेच्या समस्यांचं निराकरण, भारत संपूर्ण क्षमतांनिशी करत आहे, असंही त्यांनी सांगितलं.  परिषदेत 75 देशांचे एक हजारपेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**लोक अदालत**

सर्वोच्च न्यायालयानं, 75 वं स्थापना वर्ष साजरं करण्यासाठी घेतलेल्या, लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले असल्याची माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी काल दिली. या विशेष लोक अदालत उपक्रमाचा काल अखेरचा दिवस होता.

**अधिसूचना**

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेला, महाराष्ट्रासह सहा राज्यांमधील 56800 चौरस किलोमीटरपेक्षा जास्त परिसर, ‘पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारनं नवीन मसुदा अधिसूचना जारी केली आहे.  महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं जनतेकडून येत्या साठ दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम, पायाभूत सुविधांचा विकास यासाठी मोठ्या प्रमाणात कामं करण्यावर बंधनं येणार असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**पुणे पुनर्वसन मुख्यमंत्री सचिवालय**

पुण्यात नुकत्याच आलेल्या पुरामुळे निर्माण झालेली परिस्थिती, वारंवार उद्भवू नये म्हणून, निळ्या पूररेषेतील नागरिकांचं,कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका आणि जलसंपदा विभाग यांनी समन्वयानं तज्ज्ञांच्या सल्ल्यानं आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. याबाबतचा तात्पुरता उपाय म्हणून खडकवासला, एकता नगर, सिंहगड रास्ता इथं पूर संरक्षक मजबूत भिंत बांधण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली असून, याठिकाणी विशेष

दर्जा देऊन पुनर्विकासाचं काम करावं, असं सांगितलं आहे. पुरात वाहनांचं नुकसान झाल्यानं विमा कंपन्यांशी एकत्रितपणे बोलून तातडीनं वाहनधारकांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून प्रयत्न करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळानं, काल वर्षा या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले.

**आयुर्वेद शिक्षण मुख्यमंत्री सचिवालय**
अन्य राज्यातून बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन अर्थात बी ए एम एस केलेल्या विद्यार्थ्यांना, पदव्युत्तर आयुर्वेद शिक्षणासाठी, राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना पदव्युत्तर प्रवेश नियमात आवश्यक बदल करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या विद्यार्थ्यांना आता राज्याच्या शासकीय आणि खाजगी अनुदानित 85 टक्के तसंच खाजगी विना अनुदानित 70 टक्के कोट्यातून प्रवेश घेता येणार आहे.

**पवार भेट**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा या निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत आरक्षणासह विविध मुद्यांवर चर्चा झाल्याचं समजतं.

**संविधान मंदिर**
राज्यातील सर्व 419 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थात आय टी आय आणि 163 शासकीय तांत्रिक विद्यालयात संविधान मंदिर उभारलं जाणार आहे. येत्या 15 ऑगस्टला, स्वातंत्र्यदिनी या सर्व संविधान मंदिरांचं एकत्रित ऑनलाईन पद्धतीनं उदघाटन करण्यात येणार असल्याची माहिती कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठात आयोजित, पत्रकार परिषदेत ते बोलत होते. इथं महिन्यातून एकदा विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार असून,

राज्यघटनेतील तरतुदीबाबत विद्यार्थ्यांना शिक्षित करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत, असंही ते म्हणाले.

**अवयव दान दिन**

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभाग आणि आयुष संचालनालय यांच्या वतीनं काल राष्ट्रीय अवयवदान दिन पाळण्यात आला. यानिमित्त राज्यातल्या सर्व शासकीय वैद्यकीय, दंत आणि आयुष महाविद्यालयामार्फत अवयवदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. नंदुरबार शहरात रॅलीच्या माध्यमातून अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. आदिवासी विकासमंत्री डॉ विजयकुमार गावित त्यामध्ये सहभागी झाले होते. शासकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या रॅलीत सहभाग घेतला. यानिमित्त महाविद्यालयात गेला आठवडाभर पोस्टर, रांगोळी आणि विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**प्रवेश मुदत वाढ**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या, शैक्षणिक वर्ष 2024 -25 या वर्षातील, विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशाची मुदत वाढविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची मागणी आणि विविध जिल्हयातून मुदत वाढीसाठी आलेल्या, अभ्यास केंद्राच्या संयोजकांच्या विनंतीनुसार, हा निर्णय घेण्यात आला असून, आता 15 ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना विना विलंबशुल्क प्रवेश घेता येईल, असं विद्यापीठानं कळवलं आहे.

**इशारा**

अकोला जिल्ह्यात उद्या, सोमवारपर्यंत विजेच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तविल्यामुळे जिल्हा प्रशासनामार्फत नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यात जोरदार पाऊस झाल्यामुळं धरणांमधून विसर्ग सुरु करण्यात आला आहे. इगतपुरी घाटातल्या पावसामुळं कसारा आणि इगतपुरी रेल्वे स्थानकादरम्यान, रुळांवर दरड कोसळल्यानं तीनपैकी एका मार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली. अन्य दोन मार्गांवरील वाहतूक सुरळीत सुरु आहे. सांगली जिल्ह्यातल्या कोयना आणि वारणा धरणातून सातत्यानं विसर्ग सुरू आहे. कृष्णा नदीची पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. सर्व यंत्रणा सतर्क असून, नागरिकांनाही सतर्क

राहण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे. पुणे जिल्ह्यातील खडकवासला, पवना, मुळशी, आणि चासकमान धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत आहे. धरणं पूर्ण क्षमतेनं भरल्यामुळं मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु करण्यात येत आहे. धरणक्षेत्रात अतिवृष्टी सुरु राहिल्यास विसर्गाचा वेग वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरातील नद्यांच्या, पूररेषेलगतच्या तसंच सखल भागातील नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

पुण्यासह  पालघर आणि सातारा जिल्ह्याला अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्रासह विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात घाटमाथ्यावर  तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**